देशोन्नती

# महादुल्यात वित्तीय समावेशन संतृप्तीकरण शिबिर

देशोन्नती वृत्तसंकलन

**रामटेक** : देशाच्या आर्थिक विकासाचा पाया केवळ मोठ्या उद्योगांवर किंवा शहरांच्या प्रगतीवर उभा राहत नाही, तर गावागावातील, वस्त्यावस्त्यांतील प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक सक्षमीकरणावर तो अवलंबून असतो. हाच संदेश घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'वित्तीय समावेशन संतृप्तीकरण अभियान' या राष्ट्रव्यापी उपक्रमाची सुरुवात केली आहे. तीन महिन्यांच्या या विशेष मोहिमेद्वारे देशातील २ लाख ७० हजार ग्रामपंचायती व नागरी स्थानिक संस्थांमध्ये 'री-केवायसी' शिबिरे भरविली जात आहेत. या अभियानाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून महादुला ग्रामपंचायतमध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) सहकार्याने बँक ऑफ इंडियातर्फे वित्तीय समावेशन संतृप्तीकरण शिबिर व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला होता.

शिबिरात केवायसी व री-केवायसी अद्ययावत करणे, नवीन जनधन खाते उघडणे, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि अटल पेन्शन योजना यांत नोंदणी, दावा न केलेल्या ठेवींबाबत माहिती, तसेच डिजिटल फसवणूक प्रतिबंध यावर विशेष जनजागृती सत्र आयोजित करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून चारुलता एस. कर (कार्यकारी संचालक, आरबीआय), सचिन वाय. शेंडे (क्षेत्रीय संचालक, आरबीआय), सुजाता लाल (मुख्य महाव्यवस्थापक, आरबीआय) आणि अंजना श्यामनाथ (उप महाव्यवस्थापक, आरबीआय) यांच्यासह आशीष कुमार शर्मा (सहायक महाव्यवस्थापक, ईसीसीबी-बँक ऑफ इंडिया, नागपूर), कुलदीप किशोर( सहायक महाव्यवस्थापक, एसएमई-बँक ऑफ इंडिया, नागपूर), जिल्हा अग्रणी व्यवस्थापक चंद्रशेखर निम्बुलकर, नम्रता ठाकरे (एएफडी नागपूर), सुशील गिरिपुंजे (जीओडी नागपूर), महादुला सरपंच शरद दाडुरे व पंचाळा उपसरपंच योगेश म्हात्रे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आंचल कुमारी यांनी केले, तर आभार आशीष कुमार शर्मा यांनी मानले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी मनीष गजभिये यांच्यासह संपूर्ण टिम तसेच राहुल गणवीर, जितेंद्र चोले, रक्षक राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आंचल कुमारी यांनी केले, तर आभार आशीष कुमार शर्मा यांनी मानले.

